# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### टाळेबंदी काळात धार्मिक पर्यटन स्थळे व मंदिरे उघडण्याबाबत

**(१) ४८२५ (१७-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने टाळेबंदी शिथिल करताना धार्मिक स्थळे देखील खुली करावी, अशा प्रकारची मागणी लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाकडे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाळेबंदी झाल्याने मंदिरे बंद असल्यामुळे अनेक धार्मिक पर्यटनस्थळांचे अर्थकारण बंद झाले असून अनेक छोटे मोठे व्यावसायिक बेरोजगार झाले आहेत तसेच फुलांची शेती करणारे शेतकरी ही अडचणीत आले असून मंदिर आवारात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ६ मे, २०२० रोजी दारूची दुकाने सुरु करण्यास तसेच दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास बार व रेस्टॉरंट सुरू करण्यास परवानगी देण्यात आली असून दारू विक्री दुकानांमध्ये कोणतेही

सोशल डिस्टनसिंगचे पालन होत नसल्याच्या तक्रारी पोलीस दलाकडे प्राप्त होऊनही दारुच्या दुकानांचा कालावधी वाढविण्याबाबत पर्यटन विभागाने SOP जाहीर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सामाजिक अंतराचे पालन करुन धार्मिक स्थळे भक्तांसाठी सुरू करण्याबाबतच्या विनंतीचा विचार शासनाने केला आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रवर्गासाठी अर्थसहाय्य करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०१-१२-२०२०) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) दिनांक १४/११/२०२० च्या आदेशानुसार दिनांक १६/११/२०२० पासून राज्यातील मंदिरे उघडण्यात आली आहेत.

---

## राज्यातील शिक्षण संस्था, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(२) ४८३५ (१२-११-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण संस्था, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत मुंबईतील सहयाद्री अतिथीगृहात शिक्षक लोकप्रतिनिधींसमवेत संबंधित शासकीय अधिकाऱ्यांची दिनांक २२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीनंतर महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्यावतीने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी निधी मंजुरीचे आदेश काढणे, अंशत: अनुदानित शाळा व वर्ग तुकड्यांना प्रचलित धोरणानुसार टप्पा देणे, अघोषित शाळांना घोषित करुन संबंधित शाळांना अनुदान देणे, कनिष्ठ महाविद्यालयमधील वाढीव पदांना अनुदानासह मान्यता देणे इत्यादी मागण्यांचे निवेदन मा.शालेय शिक्षण मंत्री व मा.उप मुख्यमंत्री महोदयांना देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घोषित केलेल्या शाळांना निधी मिळावा म्हणून शालेय शिक्षण विभागाने सादर केलेला प्रस्ताव वित्त विभागाकडे अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवेदनाधीन मागण्यांच्यासंदर्भात तसेच वित्त विभागाकडे प्रलंबित प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) मंत्रिमंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या बैठकीत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, तुकड्या, अतिरिक्त शाखा यांना प्रचलित धोरणानुसार २० टक्के अनुदान देणे, तसेच २० टक्के अनुदान सुरु असलेल्या शाळांना वाढीव टप्पा अनुदान देण्याबाबतच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयातील अटीमध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम मिळणेबाबत

**(३) ४८३६ (१३-११-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाविकास आघाडी सरकारने राज्यातील थकीत कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंतची कर्जमाफीची घोषणा केली असून या योजनेची अंमलबजावणी देखील केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच दरम्यान नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांनाही रुपये ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा देखील शासनाकडून करण्यात आली असली तरी अनेक महिने उलटून देखील परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यात नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनाचे अनुदान मिळाले

नसल्याने नियमित कर्जफेड करणारे शेतकरी प्रोत्साहनापासून वंचित राहिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील किती नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान शासनाकडून देण्यात आले तसेच शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परांडा तालुक्यात नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनाचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०१-१२-२०२०) :** (१) होय.

(२) व (३) अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या खातेदारांना योग्य समर्पक योजनेव्दारे दिलासा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या प्रमाण वाढ होत असल्याबाबत

**(४) ४८४० (१३-११-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ४११ ला दिनांक २ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सततची नापिकी, अतिवृष्टी, कर्जबाजारीपणामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत असून पाच वर्षांच्या कालावधीत राज्यातील पंधरा हजारांहून जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टी व परतीच्या पावसामुळे माहे ऑगस्ट, २०२० ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील साडेतीन हजार लोकवस्तीच्या बोराळा गावात दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजी प्रभाकर जाधव, दिनांक १० ऑक्टोबर, २०२० रोजी संतोष खराटे, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२० रोजी राजीव गंगातीरे या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी आत्महत्या रोखणे, त्यांचे जीवनमान उंचावणे यासाठी सन २०१६-२०१७ मध्ये वा त्यादरम्यान राबविण्यात आलेल्या योजनांमध्ये सुमारे रुपये ९ कोटी ८८ लाख रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून सदरहू आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या तसेच उक्त आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०१-१२-२०२०)** : (१) राज्यात गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत म्हणजे जानेवारी, २०१६ ते ऑक्टोबर, २०२० मध्ये एकूण १३६५२ आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली आहेत. जिल्हास्तरीय समितीने ७६१५ प्रकरणे पात्र केली असून ५०८४ प्रकरणे अपात्र करण्यात आली आहेत. पात्र प्रकरणी ७४७४ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये एक लक्षाची मदत देण्यात आली आहे.

(२) वसमत तालुक्यात दिनांक ९ व १० ऑक्टोबर, २०२० या कालावधीत मौ.बोराळा येथे ३ आत्महत्या प्रकरणांची नोंद झाली आहे. त्यातील प्रभाकर प्रल्हाद जाधव व राजू बाबुराव गंगातीरे या आत्महत्यांच्या प्रकरणाबाबत जिल्हास्तरीय समितीच्या दिनांक १२/११/२०२० च्या बैठकीत प्रकरणे मंजूर करण्यात आली असून नियमानुसार सानुग्रह मदतीची कार्यवाही चालू आहे. तसेच संतोष बालाजी खराटे यांच्या आत्महत्याबाबत प्रथम अहवालानुसार शेतीच्या वादातील धमक्याला कंटाळून आत्महत्या केल्याची नोंद झालेली असल्याने सदर प्रकरणाची नोंद शेतकरी आत्महत्या म्हणून करण्यात आली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- i) शेती पिकांसाठी पर्याप्त सुविधा उपलब्ध होण्यासाठी विदर्भातील आत्महत्येचे प्रमाण जास्त असलेल्या ६ जिल्ह्यांकरीता विशेष पॅकेज.
- ii) शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना.
- iii) विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना.
- iv) शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुनर्रचना करण्यात आली आहे.
- v) शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात येत आहे.

उक्त योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे प्रयोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परिवहन विभागांतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५) ४८६७ (२७-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन विभागातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वर्ग अ अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असून पात्र अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीची यादी तयार असतानाही अधिकाऱ्यांच्या पदोन्नती व बदल्यांच्या प्रकरणांमध्ये मोटर सायकल आयात प्रकरणी निलंबित झालेले श्री.खरमाटे हस्तक्षेप करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका ठिकाणी तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर नियमानुसार बदली होणे क्रमप्राप्त असून वर्धा येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी कोरोना काळात मुख्यालय सोडण्याची परवानगी नसताना अर्थपूर्ण व्यवहारासाठी सातत्याने वर्ध्यावरुन पुणे, मुंबई फिरत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित पदोन्नत्यांमध्ये होत असलेली अनियमितता दूर होण्याकरीता कार्यवाही करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड.अनिल परब (०३-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीकरीता विभागीय पदोन्नती समितीने पात्र केलेल्या अधिकाऱ्यांना विभागीय महसूल संवर्ग नियमावलीतील तरतुदीनुसार विभाग वाटप करण्यात येते. त्यानंतर नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीनुसार पदस्थापना प्रस्तावित करुन सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या

बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार बदल्यांबाबत नागरी सेवा मंडळाने शिफारस केल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने बदलीचे आदेश निर्गमित करण्यात येतात.

(२) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्धा यांनी कोरोना महामारीच्या काळात कौटुंबिक कारणास्तव वेळोवेळी मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह रितसर रजा मंजूर करुन घेतली होती.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्याबाबत

**(६) ४८७३ (१२-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील अनेक गावे वर्षानुवर्षे दुष्काळात रहात असून मराठवाड्याच्या हक्काचे पाणी इतरत्र विभागांना वळवले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाचा फायदा लक्षात घेऊन प्रकल्पाच्या कामाला तातडीने सुरुवात करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाला विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन महायुती शासनाने मराठवाड्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड या महत्वाकांक्षी प्रकल्पाला सन २०१९ मध्येच प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केली असून सदर प्रकल्पाचा प्रथम टप्पा सुरु करण्यासाठी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांची निवडही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाड्यांचे हक्काचे पाणी मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच प्रकल्पाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात व निधीची तरतूद शासन करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०१-१२-२०२०) :** (१) नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, प्रकल्पांतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी औरंगाबाद, जालना, बीड, लातूर व उस्मानाबाद या पाच जिल्ह्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
मराठवाडा ग्रीड बद्दल कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये गैरप्रकार होत असल्याबाबत

**(७) ४८९० (१२-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने देशातील शाळांची इत्यंभूत माहिती एका क्लिकवर आणण्याची मोहिम सुरू केली असून राज्यातील १०१ शाळांना मान्यताच नसताना तेथे शासनाच्या योजना राबविल्याचे दाखवून सदरहू मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थाचालकांनी गैरप्रकार केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पडताळणीमध्ये ११ शाळांमध्ये मान्यता नसताना २० पेक्षा जास्त शिक्षकांची पदे भरण्यात आली, तसेच ९० शाळांमध्ये मान्यता नसताना ४०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आणले तर ६० शाळांनी नावात फेरबदल करून अनुदान घेण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सुमारे ६८१ शासकीय शाळांमध्ये आणि ९९ अनुदानित शाळांमध्ये एकही विद्यार्थी नसल्याचे निदर्शनास आले असून उक्त शाळा सन २०१९-२०२० या सत्रात सुरू होत्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शाळांमध्ये होत असलेल्या गैरप्रकाराबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई व ठाण्यामध्ये कोरोना प्रतिबंधासाठी असलेल्या लसीची अवैधरीत्या विक्री होत असल्याबाबत

**(८) ४९२४ (१२-११-२०२०) श्री.विलास पोतनीस, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चीनमध्ये कोरोना प्रतिबंधासाठी देण्यात येत असलेली लस अवैधरीत्या मुंबई व ठाण्यामध्ये विक्री करण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयसीएमआरची परवानगी नसतानाही सदरहू लस बाजारात उपलब्ध झाली असल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लसीची अवैधरीत्या विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टाळेबंदी काळात अनेक व्यायामशाळा बंद असल्याबाबत

**(९) ४९६० (१३-११-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना वायरसमुळे झालेल्या टाळेबंदी काळात अनेक व्यायामशाळा बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरात जवळपास अंदाजे ३५० व्यायामशाळा संचालक असून व्यायामशाळेतून मिळणाऱ्या उत्पन्नातुन संचालक स्वत:चा, कर्मचाऱ्यांचा उदरनिर्वाह करतात परंतु टाळेबंदीमुळे त्यांचा उदरनिर्वाह करण्याचा प्रश्न निर्माण झाला असून समाजातील जवळपास सर्वच क्षेत्र सुरू झाली परंतु शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या व्यायामशाळा बंद आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, व्यायामशाळा सुरू करण्याची परवानगी शासनाकडे मागितली असताना देखील शासनाने निर्णय न घेतल्याने संचालकांनी कर्ज घेवुन भाड्याच्या जागेत व्यायामशाळा सुरू केलेल्या आहेत, परंतु त्यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करायची असा प्रश्न संचालकासमोर निर्माण झाल्याने घेतलेले कर्ज माफ करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०१-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) टाळेबंदीमध्ये शिथिलता आणत दिनांक २३/१०/२०२० च्या आदेशानुसार दिनांक २५/१०/२०२० पासून राज्यात व्यायामशाळा सुरु करण्यात आल्या आहेत.

---

## कुडवली (ता.मुरबाड, जि.ठाणे) ग्रामपंचायत हद्दीतील दलितवस्तीस पाणीपुरवठा योजना लागू करण्याबाबत

**(१०) ४९९१ (१२-११-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडवली (ता.मुरबाड, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या हद्दीत दीड कोटीची पाणीपुरवठा योजना राबविली असून या पाणीपुरवठा योजनेपासून दलितवस्ती वंचित ठेवल्यामुळे तेथील ग्रामस्थ मागील दीड वर्षापासून पिण्याच्या पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुडवली ग्रामपंचायत हद्दीतील दलितवस्तीला पाणीपुरवठा योजनेचा लाभ मिळावा यासाठी तेथील ग्रामस्थ तसेच लोकजनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष, शरद माळवे यांनी जिल्हाधिकारी, ठाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, तहसिलदार मुरबाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुरबाड, मा.ग्रामविकास मंत्री, मा.पाणीपुरवठा मंत्री व मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा आदींकडे मागील दीड वर्षापासून निवेदने सादर करुन सातत्याने पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुडवली ग्रामपंचायत हद्दीतील दलितवस्तीला विनाविलंब पाणीपुरवठा योजना लागू न करण्यात आल्याने ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे तसेच, कुडवली ग्रामपंचायत हद्दीतील दलितवस्तीस पाणीपुरवठा योजना लागू न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कुडवली ग्रामपंचायत हद्दीतील दलितवस्तीस पाणीपुरवठा योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२६-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

दलितवस्तीतील पाणी प्रश्नाबाबत लोक जनशक्ती पार्टी यांचे दिनांक ०५/१०/२०२० रोजीचे निवेदन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुरबाड यांच्याकडे प्राप्त झाले आहे.

(३) लोक जनशक्ती पार्टीमार्फत उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे ही बाब खरी आहे. तथापि, कुडवली ग्रामपंचायत हद्दीतील दलितवस्तीकरीता सन २००८-२००९ मध्ये राबविण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेमधून पाईपलाईन टाकण्यात आली होती. तथापि, एम.आय.डी.सी. मार्फत प्राप्त होणाऱ्या पाण्याचा दाब कमी जास्त प्रमाणात असल्याने काही ठिकाणी कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत होता.

(४) कुडवली ग्रामपंचायत हद्दीतील दलितवस्तीस पाण्याचा दाब कमी जास्त असल्याने शेवटच्या १० ते १२ घरांना पुरेसे पाणी पोहोचत नव्हते. त्या अनुषंगाने ग्रामपंचायतीमार्फत नवबौध्द घटकांचा विकास योजनेंतर्गत माहे ऑगस्ट, २०२० मध्ये विंधन विहिरीवरुन लघु नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये ५ हजार लिटर पाण्याची टाकी बसविण्यात आली असून, स्टँडपोस्टव्दारे पाणी उपलब्ध आहे.

तसेच ग्रामपंचायत निधीतून दलितवस्तीसाठी कुडवली नळ पाणीपुरवठा योजनेतून माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये नवीन पाईपलाईन टाकण्यात आली असून, घरोघरी नळ कनेक्शन देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाबाबत

**(११) ५०३९ (१२-११-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचारी अनेक वर्षांपासून कमी वेतनात प्रवाशांना सोयी सुविधा पुरवण्याच्यादृष्टीने सेवा करीत असून कोरोनामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाल्याने कर्मचाऱ्यांना वेतनासाठी प्रतिक्षा करावी लागली असून त्यासाठी अनेक आंदोलने झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाला वारंवार मदत मागण्यापेक्षा परिवहन महामंडळ राज्य शासनात विलीन करून कायमस्वरूपी निर्णय घेण्यात यावा यासाठी राज्यातील २२ संघटना एकत्रित आल्या असून, अनेक वर्षांपासून सदरहू मागणीसाठी संघटना रस्त्यावर आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन योग्य प्रवासी सुविधा देण्याच्या माध्यमातून तसेच परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा विचार करता परिवहन महामंडळ शासनात विलिनीकरण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०१-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर परिणाम झाल्याने कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर, २०२० या महिन्यांचे वेतन थकलेले होते. तरी, सदर वेतन अदा करण्यात आले आहे.

(३) सद्य:स्थितीत अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## दिनांक २ मे, २०१२ नंतरच्या नियुक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत

**(१२) ५०७४ (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २ मे, २०१२ नंतरच्या नियुक्त कर्मचाऱ्यांचे थकित ठेवलेले वेतन पूर्ववत करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय, मुंबई आणि शिक्षण आयुक्त यांनी वेतन सुरू करण्याबाबत शिफारस करुनही मागील १८ महिन्यांपासून वेतन सुरू झाले नसल्याने सदरहू शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०३-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) दिनांक ०२ मे, २०१२ नंतर अनियमित नियुक्त केलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांनी रद्द केलेल्या आहेत. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याच्या निर्णयाविरुध्द दाखल झालेल्या याचिका क्र.५६२३/२०१९ व अन्य ६ याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१९ च्या निर्णयान्वये अंतरिम स्थगिती दिलेली आहे. मा.न्यायालयाने ज्या प्रकरणी अंतरिम स्थगिती दिलेली आहे, त्या कर्मचाऱ्यांचे वेतन सुरु करण्यात आलेले आहे.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्याबाबत

**(१३) ५०८२ (१३-११-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विनायकराव मेटे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ४०७१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ४५ हजार कृषी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठेवले असून बँकांनी सन २०२०-२०२१ च्या खरीप हंगामासाठी आतापर्यंत किती टक्के पीक कर्ज वाटप केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पात्र शेतकऱ्यांना पीक कर्ज दिले जाणार असल्याची जबाबदारी शासनाने घेतली असली तरी अद्यापपर्यंत राज्यभरात शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यास कागदपत्रांसाठी अडवणूक केली जात असल्याने विलंब होत असून संपूर्ण खरीप हंगाम संपला तरी शेतकऱ्यांना अद्याप पीक कर्ज मिळालेले नसून बँकांकडून आकडेवारी चुकीची सादर केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड व परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामासाठी दिलेल्या उद्दिष्टापेक्षाही कमी पीक कर्ज वाटप करणाऱ्या जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत व खाजगी बँका सोबतच लिड बँकेचे व्यवस्थापन यांच्याविरूध्द कारवाई करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.सहकार मंत्री व जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पीक कर्जाचे २५% पेक्षाही कमी उद्दिष्टपुर्ती करणाऱ्या अशा बँक व्यवस्थापक व लीड बँक व्यवस्थापन यांच्या कारभाराची चौकशी करुन त्यांच्याविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, बोरगांव ढुमणी (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील शेतकऱ्यांना खरीप हंगाम होवूनही पीक कर्जासाठी बँकेत वारंवार जावूनही संबंधित बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक यांनी पीक कर्ज मंजूर न करता उलट शिविगाळ केल्याचा प्रकार दिनांक २ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला असून कोरोना सारख्या संकटामुळे शेतकरी हतबल असताना व हंगामाची वेळ निघुन जाण्याची वेळ आली असतानाही पीक कर्ज मंजूर न करणाऱ्या व्यवस्थापकावर तसेच पीक कर्ज वाटपात निष्काळजीपणा करणाऱ्या बँकांवर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली तसेच शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०१-१२-२०२०)** : (१) होय.

राज्यातील बँकांना खरीप हंगामातील पीक कर्ज वितरणासाठी रुपये ४५,७८५ कोटी लक्षांक देण्यात आलेला आहे. त्यापैकी बँकांनी खरीप हंगामामध्ये ४५.८० लाख खातेदारांना ३४,६६९ कोटी (७६%) पीक कर्ज वाटप केलेले आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) जिल्हाधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २/०४/२०२०, दिनांक १९/०५/२०२०, दिनांक २/०६/२०२०, दिनांक ५/०८/२०२०, दिनांक १२/०८/२०२०, दिनांक २८/०८/२०२०, दिनांक २९/०८/२०२० रोजीच्या सभेमध्ये बँक व्यवस्थापक यांचा आढावा घेऊन सर्व पात्र शेतकऱ्यांना तात्काळ कर्ज वाटप करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच तालुकास्तरावर उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सहाय्यक निबंधक यांनी तालुकास्तरीय आढावा बैठका घेऊन सर्व बँक व्यवस्थापक यांना उद्दिष्टांची पुर्तता करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच जिल्हा उपनिबंधक, परभणी यांनी देखील पीक कर्ज वाटपाबाबत वेळोवेळी आढावा घेतलेला आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये अत्यल्प पीक कर्ज वाटप करणाऱ्या बँक शाखेवर जिल्हाधिकारी, नांदेड कार्यालयामार्फत जिल्ह्यातील राजपत्रित अधिकारी यांना पालक अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात आलेले आहे.

(५) बोरगाव ढुमणी (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील शेतकऱ्याला बँक ऑफ इंडिया शाखा व्यवस्थापक यांनी शिविगाळ केल्याचे निदर्शनास आले नाही.

पीक कर्ज वाटपाचा लक्षांक बँकांकडून साध्य करण्याच्या हेतुने राज्य शासनामार्फत समन्वयाची भुमिका घेतली जाते. सदर पीक कर्ज वाटपाचा लक्षांक साध्य करण्याच्या हेतुने शासनामार्फत विविध स्तरावरुन बँकांसमवेत समन्वय साधुन कार्यवाहीच्या सूचना दिलेल्या आहेत. मा.मुख्यमंत्री यांनी राज्यस्तरीय खरीप आढावा सभा दिनांक २१/०५/२०२०, राज्यस्तरीय बँकर्स समितीची विशेष सभा दिनांक २९/०५/२०२०, दिनांक ०८/०६/२०२० रोजीच्या सभेमध्ये बँकांना पीक कर्ज वाटपासाठी सर्वोतोपरी उपाययोजना करुन लक्षांक साध्य करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. तसेच मुख्य सचिव यांनी दिनांक १७/०६/२०२० व दिनांक २८/०८/२०२० रोजीच्या बँकांच्या सभेमध्ये उक्त सुचनांची पुनरावृत्ती केली आहे. सहकार आयुक्त कार्यालयामार्फत दिनांक २९/०५/२०२०, दिनांक ०४/०६/२०२०, दिनांक २३/०६/२०२०, दिनांक ३१/०७/२०२० रोजी आयोजित सभांमधुन बँका तसेच क्षेत्रिय अधिकाऱ्यांना पीक कर्ज वाटप तसेच कर्जमाफी योजनेच्या लाभार्थ्यांना पीक कर्ज वाटपाच्या अनुषंगाने सूचना दिलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील माध्यमिक शाळेतील ग्रंथपाल पद मंजुरीसाठी विद्यार्थी संख्या शिथिल होण्याबाबत

**(१४) ५११४ (१२-११-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक ९८६ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल पद हे पूर्णवेळ ग्रंथपाल या वर्गामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतला असून या निर्णयात अनेक जाचक अटींचा अंतर्भाव करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकेतर आकृतिबंधातील विद्यार्थी संख्या निकषानुसार सन २०१८-२०१९ ची शिक्षकेतर संचमान्यता शाळांना प्राप्त झाली असून ही संचमान्यता ग्रंथपालांवर अन्यायकारक ठरलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकेतर आकृतिबंधात ग्रंथपाल पद मंजुरीसाठी विद्यार्थी संख्या शिथिल होण्याबाबत दिनांक ९ जून, २०२० रोजी तसेच, शासन निर्णय, दिनांक १ सप्टेंबर, २०१८ नुसार अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ रिक्त पदी समायोजन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रंथपालांच्या जाचक अटी शिथिल करुन १००० विद्यार्थी संस्थेऐवजी ७०० विद्यार्थी संस्थेमागे एक पूर्णवेळ ग्रंथपाल करावा व २ शाळा मिळून एक पूर्ण वेळ ग्रंथपाल असावा अशी मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील बहुतांश भाग हा ग्रामीण व दुर्गम भाग असून या भागाची लोकसंख्या कमी असल्याने पटसंख्या सुध्दा कमी आहे तसेच मागील वर्षाच्या नियमाप्रमाणे या वर्षीही शासन अनुदान देणार आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीनुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे आहे.
(५) पटसंख्या कमी झाल्यामुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन होईपर्यंत त्यांना त्याच शाळेतून वेतन देण्यात येते.

(६) पूर्णवेळ ग्रंथपालांचे समायोजन करण्यासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथील करण्याबाबतचा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

---

## आश्वासित प्रगती योजना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत

**(१५) ५१२८ (१३-११-२०२०) श्री.कपिल पाटील, डॉ.रणजित पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सुरेश धस, श्री.विलास पोतनीस, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर १०, २० व ३० वर्षानंतरची सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली असून सदर योजना राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आकृतिबंधाच्या निकषानुसार अंमलबजावणी होवून लागू करण्याबाबत शासन निर्णय, दिनांक ३१ जुलै, २०१९ अन्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली असून गठित केलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी याकरीता मा.मंत्री यांनी सभागृहास आश्वासित करूनही शिक्षकांना सदरहू योजना लागू झाली नाही, तसेच सदरहू अभ्यास गटाने या विषयासंदर्भातील अहवाल व त्यावरील शिफारस आजपर्यंत सादर केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातव्या वेतन आयोगात बक्षी समितीने केवळ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०, २० व ३० वर्षाच्या सेवेनंतर देय होणारी तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतची शिफारस

केल्याने शासनाने दिनांक ३१ जुलै, २०१९ रोजी अभ्यासगट नेमलेला आहे, सदरहू अभ्यासगटाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, सदर अहवालात अभ्यासगटाने केलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच, उक्त अहवालातील कोणकोणत्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या आहेत, तद्नुषंगाने घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) तसेच, राज्यातील प्राथमिक शिक्षक वगळता माध्यमिक शिक्षकांसह इतर सर्व कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती (१०, २० व ३०) योजना लागू करण्यात आली असून सदरहू योजनेत जिल्हा परिषद सेवेतील प्राथमिक शिक्षकांना वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीवर निर्णय घेऊन १०, २० व ३० वर्षानंतरची योजना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच जिल्हा परिषदेत सेवेतील शिक्षकांना लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-१२-२०२०) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू करणे व इतर बाबींच्या अनुषंगाने अभ्यास गट दिनांक ३१/७/२०१९ रोजी गठित करण्यात आलेला असून सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून तो तपासण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संचमान्यतेच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबत

**(१६) ५१७२ (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमईपीएस कायद्याने निश्चित केलेल्या संचमान्यतेच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ व दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबतची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१) नाही.

(२) व (३) संचमान्यता शासन निर्णय सुधारित करण्याच्या अनुषंगाने आयुक्त, शिक्षण यांनी दिनांक १३/०७/२०२० रोजी अहवाल सादर केला असून सदर अहवाल तपासण्यात येत आहे.

---

## शेतकऱ्यांना सौर कृषी पंप योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(१७) ५२७२ (१३-११-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतकऱ्यांची काही प्रमाणात विजेच्या अनियमततेमुळे होणारी गैरसोय टाळण्याकरीता मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना अंमलात आणली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची प्रशासकीय यंत्रणेकडून पारदर्शक अंमलबजावणी होत नसल्याने भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील अनेक शेतकऱ्यांनी दिड वर्षापासून ऑनलाईन पैसे भरुन देखील या योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितिन राऊत (२७-११-२०२०) :** (१) होय, शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे व राज्य शासनाची पारंपारिक पध्दतीने कृषी पंप जोडणीसाठी लागणाऱ्या खर्चात व राज्य शासनाव्दारे सबसीडीपोटी देण्यात येणाऱ्या अनुदान खर्चाचे उद्दिष्ट साध्य व्हावे याकरीता दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ व दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना" सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत टप्प्याटप्प्याने एकूण १ लक्ष नग सौर कृषी पंप आस्थापित करण्यात येणार आहेत.
(२) हे खरे नाही, जालना जिल्ह्यातील भोकरदान तालुक्यातील मौजे पिंपळगाव रेणुकाई या गावातील ४१ शेतकऱ्यांनी सदर योजनेंतर्गत अर्ज केले आहेत. त्यापैकी २१ शेतकऱ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. मंजूर २१ शेतकऱ्यांपैकी १३ शेतकऱ्यांनी मागणी पत्राचा भरणा केलेला असून त्यापैकी ११ शेतकऱ्यांचे सौर कृषी पंप आस्थापित झालेले आहेत. उर्वरीत २ सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दप्तर दिरंगाई कायद्यातील तरतुदीनुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१८) ५२७७ (१२-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दप्तर दिरंगाई कायद्यातील तरतुदीनुसार कर्तव्य व जबाबदारी पार न पाडणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कलम क्रमांक १० (३) नुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्याबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी अप्पर मुख्य सचिव व आयुक्त (शिक्षण) यांना दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन पाठवून कारवाई करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार सर्व शिक्षणाधिकारी ते शिक्षण संचालकापर्यंत येणाऱ्या सर्व संबंधित शिक्षण कार्यालयातील संपूर्ण प्रलंबित कारभाराची तसेच प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचा अहवाल काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१) अशा आशयाचे निवेदन आयुक्त (शिक्षण), पुणे व विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना प्राप्त झाले, हे खरे आहे.
(२), (३) व (४) याबाबत शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित कालावधीत कार्यवाही करण्याबाबत अन्यथा सदर अधिनियमातील कलम १०(३) नुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना शासन परिपत्रक, दिनांक ०९/०६/२०२० अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांना संबंधित अधिनियमाचे पालन करण्याबाबत आवश्यक त्या सूचना आयुक्त (शिक्षण) कार्यालयाकडून दिनांक २७/११/२०२० च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

___

## राज्यातील ग्रंथपालांना कालबध्द वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत

**(१९) ५२८० (१२-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रंथपालांना शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ३१ एप्रिल, १९९८ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक ०१ एप्रिल, १९९४ पासून कालबध्द वेतनश्रेणी लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक विभाग वगळता राज्यातील इतर विभागातील जिल्हयांमधील वंचित ग्रंथपालांना ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार कालबध्द वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, ग्रंथालय विभाग, नाशिक यांनी व नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी सदरहू प्रकरणाबाबत दिनांक ३० ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन पाठवून ग्रंथपालांवर होत असलेला अन्याय दूर करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रंथपालांना कालबध्द वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१/१२/२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील खाजगी अनुदानित शाळांतील ग्रंथपालांना सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आलेली नाही.

(३) व (४) दिनांक २०/०८/२०२० चे निवेदन शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांना प्राप्त झाले असून ते तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धाकटी डहाणूचा (जि.पालघर) जलजीवन मिशन अंतर्गत समावेश करण्याबाबत

**(२०) ५२९४ (१२-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाकटी डहाणू (जि.पालघर) समुद्रकिनाऱ्यालगत असून गावातील विहिरींमध्ये समुद्राचे खारे पाणी येत असल्याने ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाडापोखरण पाणीपुरवठा योजनेतून योग्य पाणीपुरवठा होत नसल्याने जल जीवन मिशन अंतर्गत धाकटी डहाणूचा समावेश करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने धाकटी डहाणूचा जल जीवन मिशन अंतर्गत समावेश करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२६-११-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) धाकटी डहाणू नळ पाणीपुरवठा योजनेबाबत मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९/०९/२०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये धाकटी डहाणू गाव जल जीवन मिशन अंतर्गत समाविष्ट करावे असे मा.मंत्री महोदयांनी निर्देश दिले. त्यानुसार धाकटी डहाणू गावाचा समावेश जल जीवन मिशन अंतर्गत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) आदिवासी आश्रमशाळेच्या बांधकामाबाबत

**(२१) ५३६५ (१३-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) आदिवासी आश्रमशाळेचे बांधकाम शासकीय अधिकाऱ्यांच्या सहभागाने सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटमध्ये कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग ठाणे (आदिवासी विकास) यांनी बेकायदेशिररित्या बदल करून दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजीच्या पत्रानुसार Chaitanya Construction या कंपनीस कंत्राट दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, ठाणे सा.बां. (आदिवासी विकास) विभाग, ठाणे यांस निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

मौजे गुहीर, ता.वाडा, जि.पालघर येथील आदिवासी आश्रमशाळेचे बांधकाम हे शासकीय नोंदणीकृत ठेकेदार मे.माफको इंटरप्रायझेस, गोरेगांव, मुंबई यांना देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर आश्रमशाळेचे बांधकाम मे.माफको इंटरप्रायझेस, गोरेगांव, मुंबई यांच्याकडूनच करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, ठाणे यांना मा.लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे.

(४) सदर निवेदनास अनुसरुन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, ठाणे यांनी त्यांचे पत्र क्र.२४८४, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० अन्वये मा.लोकप्रतिनिधींना वस्तुस्थितीदर्शक खुलासा कळविला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रुपी बँक, पुणे यावर असलेले आर्थिक निर्बंध

**(२२) ५३६७ (१३-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक १५४३ ला दिनांक ९ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुमारे ५५ हजार सभासद आणि सात लाख ठेवीदार असलेल्या तसेच १४०० कोटी रुपयांच्या ठेवी असलेल्या सुमारे १०५ वर्षांच्या पुणे येथील रुपी बँकेतील प्रशासकीय व आर्थिक अनियमिततेमुळे रिझर्व बँकेने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१३ रोजीपासून आर्थिक निर्बंध घातलेले असून बँक अवसायानाच्या मार्गावर आहे व त्यामुळे शासनाने यात सुयोग्य तोडगा काढावा यासाठी बँकेचे खातेदार व ठेवीदार यांनी सहकार विभागाकडे लेखी स्वरुपात विनंती केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या सात वर्षांपासून बँकेचे खातेदार व ठेवीदार यांचेवर आर्थिक संकट आलेले असल्यामुळे त्यांना दिलासा मिळावा, यासाठी राज्य शासनाकडून काही प्रयत्न करण्यात आले आहेत काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर बँकेच्या संदर्भात कायमस्वरुपी तोडगा निघण्यासाठी सहकार आयुक्त कार्यालयाने सदर बँक महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत विलिनीकरण करण्याच्यादृष्टीने संयुक्त प्रस्ताव दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास रिझर्व बँकेकडे सादर केलेला आहे त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बँकेचे सभासद व ठेवीदार यांना दिलासा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०१-१२-२०२०)** : (१) होय.
(२), (३) व (४) रुपी बँकेवर आर्थिक निर्बंध लागू झाल्यापासून ऑक्टोबर, २०२० अखेर पर्यंत सुमारे रुपये ३४०.४० कोटीची कर्ज वसूली करण्यात आली आहे. ठेवीदारांची होत असलेली आर्थिक गैरसोय विचारात घेऊन रिझर्व बँकेच्या संमतीने हार्ड शिप योजना लागू केली असून ऑक्टोबर, २०२० अखेर पर्यंत सदर योजनेव्दारे ८९,८७३ ठेवीदारांना रुपये ३५५.२३ कोटींच्या ठेवी परत केल्या आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करुन बँकेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार संबंधित संचालक/अधिकारी यांच्याविरुध्द एकूण रुपये १४९० कोटींची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. संबंधितांनी सदर आदेशाविरुध्द (मंत्री) सहकार यांचेकडे अपील केले असून त्यानुसार (मंत्री) सहकार यांनी या आदेशास अंतरीम स्थगिती दिली आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरणे अप्पर मुख्य सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचेकडे वर्ग करण्यात आली असून चौकशीची पुढील कार्यवाही अप्पर मुख्य सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचेस्तरावर सुरु आहे.

रुपी बँकेचा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत विलिनीकरणाचा प्रस्ताव दिनांक १६/०१/२०२० रोजी रिझर्व बँकेकडे सादर केलेला आहे. त्यानुषंगाने रिझर्व बँकेने दिनांक २४/०८/२०२० च्या पत्रान्वये विलिनीकरणाबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यासाठी राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), मुंबई यांचा सल्ला घेण्याचे निर्देश सहकार आयुक्तांना दिले आहेत. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत

**(२३) ५३७६ (१३-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ४८ ला दिनांक ९ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी सखोल संशोधन व पुरावे एकत्रित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २०१२ मध्ये जेष्ठ साहित्यिक प्रा.रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात भाषा समिती स्थापन केली होती व या समितीने सन २०१३ मध्ये आपला अहवाल राज्य शासनास सादर केलेला असून मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे सुमारे दोन वर्षापूर्वी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळाली नसल्यास याबाबत राज्य शासनाकडून कशाप्रकारे पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२७-११-२०२०) :** (१) होय.

(२) सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित असून, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

(३) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा.मुख्य सचिव, सचिव यांचेस्तरावर केंद्र शासनाशी पत्रव्यवहार सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी शिकवणी वर्गावर निर्बंध घालण्याबाबत

**(२४) ५३८८ (१२-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी शिकवणी वर्ग चालकाकडून विद्यार्थ्यांची फसवणूक होत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने खाजगी शिकवणी वर्गावर निर्बंध घालण्यासाठी कायदा करण्याची शिफारस करण्यासाठी सन २०१७ मध्ये तत्कालीन शिक्षण आयुक्त डॉ.बिपीन शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या १४ सदस्यांच्या समितीने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालाचे स्वरुप काय आहे व अहवालावर अद्याप निर्णय न घेण्याची कारणे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-११-२०२०) :** (१) सदरचा अहवाल दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी सादर झाला आहे.

(२) राज्यामध्ये खाजगी शिकवण्या/कोचिंग क्लासेसमधील गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासंदर्भात समितीने शिफारस केली आहे. सदर अहवाल तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२५) ५३९० (१२-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत करण्यात येत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन शासनाने दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी मुस्लीम (विशेष मागास प्रवर्ग) समाजासाठी नोकरी व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी पाच टक्के आरक्षण देण्याबाबतची घोषणा मा.अल्पसंख्यांक मंत्र्यांनी माहे फेब्रुवारी-मार्च, २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सभागृहात केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झालेली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले असून घटनेनुसार धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याबाबतची बाब तपासून उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुस्लीम समाजासाठी नोकरी व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी पाच टक्के आरक्षण देण्याचा निर्णय अंमलात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मुस्लीम समाजास (विशेष मागास प्रवर्ग-अ) नोकरी व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विविध शैक्षणिक संस्थांमधील शिष्यवृत्तीच्या रक्कमेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२६) ५४०३ (२५-११-२०२०) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना सन २००९ ते २०११ या कालावधीत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेत १७० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषींवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय, तसेच दोषी संस्थांची पडताळणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## किनवट (जि.नांदेड) तालुक्यात प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा कॅम्प पुन्हा सुरु करण्याबाबत

**(२७) ५४०९ (१२-११-२०२०) श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुका १५० कि.मी. असल्याने वाहनधारकांना विविध परवाने मिळण्यासाठी परिवहन विभागाने किनवट येथे दरमहा प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा कॅम्प सुरु केला होता परंतु कोरोना महामारीमुळे मागील ८ महिन्यापासून सदरहू कॅम्प बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किनवट तालुका अतिदुर्गम व जिल्हयाच्या ठिकाणापासून दुर अंतरावर असल्याने येथील नागरिकांना परिवहन विभागाच्या विविध परवाने, परवानगी, फिटनेस व वाहनाच्या पासिंग संबंधी विविध सेवा प्राप्त करुन घेण्यास अत्यंत त्रासदायक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन किनवट येथे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा कॅम्प पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. अनिल परब (०१-१२-२०२०) :** (१) होय.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे खबरदारीचा उपाय म्हणून दिनांक २२/०३/२०२० पासून शिबिर कार्यालयाचे कामकाज बंद करण्यात आले होते.
(२) व (३) परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दिनांक १९/०८/२०२० रोजीच्या आदेशान्वये सर्व परिवहन कार्यालयांना शिबिर कार्यालय सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले होते. किनवट (जि.नांदेड) येथील शिबिर कार्यालय आयोजित करण्यात येत असलेली जागा कोविड-१९ उपाययोजना व नियंत्रण कामकाजासाठी अधिग्रहीत करण्यात आली होती. सदर अधिग्रहीत जागा माहे नोव्हेंबर, २०२० पासून उपलब्ध झाल्याने माहे नोव्हेंबर, २०२० पासून किनवट येथे शिबिर कार्यालय पुन्हा सुरु करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळाची थकबाकी देण्याबाबत

**(२८) ५४२३ (१२-११-२०२०) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे : दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ३०३३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाचे शासनाकडे पाचशे कोटी थकबाकी असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थी, दिव्यांग ज्येष्ठ नागरिक पत्रकार यांना प्रवासात मिळणाऱ्या सवलतींची सुमारे तीन हजार कोटी रुपयांची थकबाकी शासनाने अद्याप दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुनावणी दरम्यान सन २०१४ मध्ये रुपये २७२७ कोटींपैकी काही रक्कम जमा करण्यात आली असून माहे नोव्हेंबर, २०१९ पर्यंतची थकबाकीची रक्कम पाचशे कोटी रुपये आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित थकबाकी संदर्भात कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०१-१२-२०२०) :** (१) मार्च, २०२० अखेर रुपये ६९७.१२ कोटी एवढी रक्कम सवलत मूल्यांपोटी शासनाकडून महामंडळास येणे प्रलंबित होती. सदरची सर्व रक्कम शासनाव्दारे महामंडळास अदा करण्यात आली आहे.
(२) नाही.
(३) वित्तीय वर्ष २०१४-२०१५ अखेर शासनाकडून सवलत मूल्यांपोटी रुपये २७२७.५९ कोटी एवढी रक्कम येणे प्रलंबित होती. सदर रक्कम वेळोवेळी महामंडळास अदा करण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रंथालये सुरु करुन अनुदानाचा हप्ता देण्याबाबत

**(२९) ५४२७ (१२-११-२०२०) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे ग्रंथालये बंद असल्याने ग्रंथालयातील पुस्तकांना वाळवी लागल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड तसेच राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय अंशत: का होईना कोविड धोरणाच्या सर्व नियम अटी लागू करुन सुरु करावे तसेच सार्वजनिक ग्रंथालयाचे मागील आठ वर्षापासून प्रलंबित असलेले अनुदान दुप्पट करुन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करण्याची मागणी संबंधित करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात शासनाने कोरोना टाळेबंदीत शिथीलता देत हॉटेल, मॉल्स, उपहारगृहे, बारसह अनेक उद्योगांना परवानगी दिली, मात्र राज्यातील हजारो ग्रंथालय सुरू करण्याची परवानगी दिली नसल्याने पुस्तके बंद कपाटात राहून खराब होत आहेत तसेच अनुदानाचा हप्ताही वितरित करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून दरवर्षी देण्यात येणारे अनुदान ग्रंथालयाच्या खात्यात जमा न झाल्यामुळे सर्व ग्रंथालये अडचणीत असल्याने नवीन पुस्तके खरेदी झालेली नाहीत, तसेच अभ्यासिका दररोज १२ ते १६ तास सुरू असतात त्यांच्या माध्यमातुन ग्रंथालयांना दरमहा विशिष्ट रक्कम मिळते, परंतु ग्रंथालय बंद असल्यामुळे ग्रंथालयाचे उत्पन्न कमी झाले असून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रंथालये सुरु करण्याबाबत परवानगी देवून अनुदानाचा हप्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) ग्रंथालय संचालकांच्या दिनांक १५/१०/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये ग्रंथालय सेवा सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

निधीअभावी सन २०१९-२०२० मध्ये देय असलेले थकित परिरक्षण अनुदान रुपये ३०.९३ कोटी शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक ३/०८/२०२० अन्वये राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वितरित करण्यात आले असून वित्त विभागाकडून प्राप्त सहमतीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक २४/११/२०२० अन्वये ग्रंथालयांचे सन २०२०-२०२१ साठी १२.३७ कोटी इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अल्पसंख्यांक शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना पूर्ववत सुरू करण्याबाबत

**(३०) ५५७३ (१२-११-२०२०) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्यांक शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी शासनाने दिनांक ५ फेब्रुवारी, २००९ रोजी काढलेल्या परिपत्रकान्वये अनुदान योजना सुरु केली असून प्रत्येक अल्पसंख्यांक संस्थेस दोन लाख याप्रमाणे पाच वर्षासाठी दहा लाख रुपये मंजूर केले होते, परंतु सद्य:स्थितीत सदरहू योजना खंडित झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त योजनेंतर्गत प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या फक्त एकाच शाळेस अनुदान देत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त योजना पूर्ववत सुरू करून योजनेची पाच वर्षाची मुदत रद्द करून पंधरा वर्षासाठी करण्याबाबत तसेच प्रत्येक संस्थेच्या सर्व शाळांसाठी योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (०१-१२-२०२०) :** (१) अंशत खरे आहे.

मात्र अल्पसंख्याक शाळांमध्ये पायाभूत सुविधा राबविण्यासाठीच्या शासन निर्णय, दिनांक ५ फेब्रुवारी, २००९ हा अधिक्रमित करण्यात आलेला असून सद्य:स्थितीत शासन निर्णय, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ अन्वये उक्त योजना सुरू आहे.

(२) व (३) अर्जदार संस्थेच्या एका DISE CODE / Institute Code / लायसन्स क्रमांकासाठी फक्त एकदाच अनुदान देण्यात येते. तथापि, एकाच इमारतीत / आवारात एकाच संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक अशा वेगवेगळ्या शाळा / महाविद्यालये हे दिवसभरातील स्वतंत्र वेळापत्रकानुसार वेगवेगळ्या पाळीत / सत्रात भरत असतील आणि त्यांचे DISE CODE वेगवेगळे असतील अशा परिस्थितीत त्या इमारतीसाठी / आवारासाठी या DISE CODEs पैकी फक्त एकाच DISE Code साठी अनुदान मंजूर करण्यात येते.

सदर योजनेतील पाच वर्षांची मुदत वाढविण्याची कोणतीही बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून वंचित राहिल्याबाबत

**(३१) ५५९१ (१३-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून ११ लाख शेतकरी कर्ज मुक्तीपासून वंचित असून शासनाने जाहीर करूनही शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात पैसे भरलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाने महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना शेतकऱ्यांसाठी आखली आणि त्या अंतर्गत शेतकरी कर्ज माफी झाली, परंतु

सांगली जिल्ह्यात गोटखिंडी गावांमध्ये जमिनीचे क्षेत्र नसणाऱ्या लोकांनासुध्दा कर्ज पुरवठा केला गेला व कर्जमाफीच्या यादीमध्ये देखील त्यांचे नाव आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही लोक शेतीशी निगडित नसतानाही त्यांच्या खात्यात रक्कम जमा झाल्याने आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त होत असून अनेक तक्रारी जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ पातळीवर प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पावसाळी अधिवेशन, २०२० मध्ये पुरवण्या मागण्याच्या चर्चेदरम्यान मा.लोकप्रतिनिधींनी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कर्जमाफीपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०१-१२-२०२०) :** (१) नाही.

(२), (३) व (४) होय.

(५) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही चालू असून आतापर्यंत ३०.७८ लाख खातेदारांना रुपये १९,६४४ कोटीचा लाभ देण्यात आलेला आहे.

(६) सांगली जिल्ह्यातील प्रकरणामध्ये लेखापरीक्षकामार्फत चौकशी करण्यात येऊन १३३ व्यक्तींविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## इंटिग्रेटेडच्या नावाखाली सुरु असलेल्या बेकायदेशीर कोचिंग क्लासेसविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(३२) ५६०३ (१२-११-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३४२ ला दिनांक ६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यभरासाठी लागू करण्यात आलेल्या स्वयं अर्थसहाय्यित शाळा (self financed school) कायद्यांतर्गत इंटिग्रेटेड संदर्भात नियमावली तयार केली असून या नियमावलीनुसार किमान ५०० चौ.मी.ची मालकी हक्काची अथवा ३० वर्ष भाडेपट्टयाची जागा त्याचबरोबर ग्रंथालय तिथे प्रयोगशाळा, संगणक कक्ष, मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी स्वतंत्र कक्ष याबाबी बंधनकारक असतानाही सदरच्या अटीची पूर्तता न करताच अनेक कनिष्ठ महाविद्यालयांना शिक्षण विभागाने मान्यता दिली असल्याचे दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई, ठाणे व त्यालगतच्या शहरांमधील खाजगी कोचिंग क्लासेसकडून नियमबाहय पध्दतीने बी.एड. सह विविध अभ्यासक्रमांच्या पदव्या विकत दिल्या जात असल्याचे तसेच भरमसाठ शुल्क आकारुन कोणत्याही तासिकेला न बसता व परिक्षेला बनावट उमेदवार बसवून पदवी प्रमाणपत्रे दिले जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासन अटींची पूर्तता न करता कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता देणाऱ्या संबंधित शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द तसेच नियमबाह्यरित्या पदव्या प्रमाणपत्रे वाटप व बोगस विद्यार्थी परिक्षेत बसविल्याप्रकरणी कोचिंग क्लासेसविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१) काही कनिष्ठ महाविद्यालयांस त्रुटी पुर्तता करण्याच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी त्रुटींची पुर्तता केली नाही, अशा ८ कनिष्ठ महाविद्यालयांची मान्यता शासनाने रद्द केली आहे. तथापि, सदर आदेशास मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्थगिती देऊन शासनास सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऐतिहासिक व पुरातन वारसा लाभलेल्या वारी हनुमान सागर येथील तीर्थक्षेत्राचा विकास करण्याबाबत

**(३३) ५६१६ (१२-११-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला, बुलढाणा व अमरावती या तीन जिल्ह्यांच्या सीमेवरील मौजे हिवरखेडनजिक तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात प्रमुख तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ म्हणून हनुमान सागर असून दररोज लाखो भाविक, पर्यटक व अभ्यासक या ठिकाणी श्रध्दास्थान म्हणून भेट देत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तीर्थक्षेत्र प्राचीन काळापासून अस्तित्वात असून तेथील गौमुख कुंडातून निरंतर शुध्द पिण्याचे पाणी वाहत असून त्याच परिसरात मामा-भाचा डोह, राजन्या डोह, सिता न्हाणी तसेच हनुमान सागर व वाण प्रकल्प धरण इत्यादी तीर्थक्षेत्रासह पर्यटनदृष्ट्या महत्वाची ठिकाणे आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मामा-भाचा डोहाच्या पाण्यामध्ये पोहण्यासाठी उतरणाऱ्या शेकडो नागरिक व पर्यटकांना पाण्यात बुडाल्यामुळे प्राण गमवावे लागल्याने मामा-भाचा डोह बुजवून त्या ठिकाणी हिमाचल प्रदेश राज्यातील भागसुनाथ व धर्मशाळा या पर्यटन स्थळांच्या धर्तीवर नैसर्गिकरित्या वाहणाऱ्या पाण्याचा

आकर्षक तरणतलाव बांधावा तसेच पार्किंग ते हनुमान मंदिर, मंदिर ते वाण धरण व धरण ते पार्किंग असा ट्रॉली रोप-वे निर्माण करावा अशी तेथील नागरीकांची मागणी केली असून त्याबाबत स्थानिक मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ सप्टेंबर, २०२० रोजी मा.पर्यटन मंत्री यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०१-१२-२०२०) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर निवेदना संदर्भात संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून अहवाल / अभिप्राय मागविण्यात आले असून त्यांच्या अभिप्रायानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर-धेरंड (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील भाताचे पीक नष्ट झाल्याबाबत

**(३४) ५६४१ (१३-११-२०२०) श्री.जयंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **खार जमिनी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील शहापूर-धेरंड येथील खारबंधिस्ती उध्वस्त झाल्यामुळे तब्बल २०० एकर शेतामध्ये खारे पाणी घुसुन भाताचे सुमारे ४० लाख रुपयांचे पीक नष्ट झाल्यामुळे तसेच सलग आठ दिवस पडलेल्या परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसीने सन २०१९ मध्ये शहापूर-धेरंड येथील संपादित केलेल्या जमिनीच्या खारबंधिस्तीचे काम अद्यापपर्यंत पूर्ण केले नाही तसेच संपादित केलेल्या जमिनीत एमआयडीसीचा कोणताच प्रकल्प नसून सततच्या समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे भातशेती करपणे, कोरोना व निसर्ग चक्रीवादळ, अतिवृष्टीमुळे शेती, नोकरी व रोजगार नसलेल्या शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतात समुद्राचे खारे पाणी येवू नये तसेच भातपिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याबाबत उपाययोजना करून संबंधित दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०२-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

अलिबाग तालुक्यातील शहापूर व धेरंड येथील शेतकऱ्यांचे माहे ऑक्टोबर, २०२० मधील परतीच्या पावसाने नुकसान झाले आहे.

(२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अलिबाग विभाग (MIDC) यांचेकडून धेरंड, शहापूर हद्दीतील खारभूमीच्या तातडीच्या दुरुस्तीच्या कामाची रुपये ३२.९१ लक्ष इतक्या रकमेची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच काम हाती घेण्यात येईल.

(३) अलिबाग तालुक्यातील शहापूर व धेरंड येथील ३८३ शेतकऱ्यांचे माहे ऑक्टोबर, २०२० मधील परतीच्या पावसाने १३४ हेक्टर भात शेतीच्या नुकसानीचे कृषी विभागामार्फत पंचनामे करण्यात आले आहेत.

महसूल व वन विभागाच्या दिनांक ०९/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात माहे जून ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या नागरिकांना आर्थिक मदतीचा पहिला हप्ता विभागीय आयुक्तांना वितरित करण्यात आला आहे. त्यानुसार कोकण विभागांतर्गत रायगड जिल्ह्यासाठी शेती पिकांच्या नुकसानीसाठी रुपये १४३५.३७ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील निसर्ग चक्रीवादळग्रस्तांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(३५) ५६४२ (१३-११-२०२०) श्री.जयंत पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, ठाणे, रायगडसह कोकणात दिनांक ३ जून, २०२० रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे घरे, समुद्रकिनारी असलेल्या टपऱ्या व दुकाने, गुरांचे गोठे, झोपड्या, शेती व बागायतींचे तसेच मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील अलिबाग, श्रीवर्धन, म्हसळा, रोहा, माणगाव, मुरूड व सुधागड या तालुक्यासह इतर तालुक्यातील बागायतदार तसेच अनेक ठिकाणचे निसर्ग चक्रीवादळग्रस्त पूर्णपणे नुकसान भरपाईपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निसर्ग चक्रीवादळग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०१-१२-२०२०) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

जवळ-जवळ ७५% पेक्षाहून अधिक प्रमाणात मदतीचे वाटप झालेले असून गा.न.नं. ७/१२ मधील सामायिक क्षेत्र असल्यास सह हिस्सेदाराचे संमतीपत्र नसणे, बँक खात्यातील तफावत या कारणांमुळे वाटप राहिलेले आहे. याबाबतची पूर्तता करून मदत वाटपाचे कामकाज सुरू आहे.

(३) निसर्ग चक्रीवादळामुळे घर पडझडीसाठी तसेच घर पडझडीमुळे देण्यात येणारे सानुग्रह अनुदान, दुकानदार, टपरीधारक, व्यावसायिक तसेच बहुवार्षिक पिके यांच्या नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा वाढीव दराने मदत देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पडवे (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) गावातील पाणीपुरवठा योजनेच्या प्रलंबित कामाबाबत

**(३६) ५६५८ (१३-११-२०२०) श्री.जयंत पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पडवे (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) गावातील पाणीपुरवठा योजनेच्या कामास पेयजल योजनेंतर्गत रुपये १ कोटी ८० लाख अंदाजपत्रकीय मंजूरी मिळाल्यानंतरही सदरहू योजनेचे काम प्रलंबित असल्यामुळे तेथील आक्रमक झालेल्या ग्रामस्थांनी आंदोलन करण्याचा इशारा माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जोपर्यंत सदरहू योजनेचे स्ट्रक्चरल ऑडिट व काम पूर्ण होत नाही तोपर्यंत ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे देयक अदा करण्यात येऊ नयेत, अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पाणीपुरवठा योजनेची कामे सुरु करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी तेथील ग्रामस्थांसमवेत दिनांक २५/०९/२०२० रोजी योजनेची प्राथमिक पाहणी केली. पाहणीच्यावेळी सकृतदर्शनी दोष आढळून आला नाही. तथापि, दरम्यानच्या कालावधीत कोविड-१९ चा प्रादुर्भाव तसेच त्यानंतरच्या

पावसाळ्यामुळे काम सुरु करण्यास विलंब झाला असून उर्वरित कामे सुरु करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या स्तरावर सखोल चौकशी करुन योजना पूर्ण करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना व नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत जाहीर करण्याबाबत

**(३७) ५६६२ (१७-११-२०२०) श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.रामनिवास सिंह, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.निलय नाईक, श्री.विनायकराव मेटे, श्री.संजय दौंड, श्री.रमेश कराड, श्री.राजेश राठोड, श्री.नरेंद्र दराडे, श्री.प्रशांत परिचारक, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठवाडा, विदर्भ तसेच उर्वरित महाराष्ट्रात विशेषत: सांगली, सोलापूर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, पंढरपूर, भंडारा, गोंदिया, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, अमरावती, औरंगाबाद, लातुर, उस्मानाबाद, परभणी, जालना, बीड, बुलढाणा, नांदेड, अकोला इत्यादी भागात माहे जून ते ऑक्टोबर, २०२० अखेरपर्यंत अतिवृष्टी, पूर व ढगफुटीमुळे हजारो हेक्टरमधील खरीप व रब्बी पीक विशेषत: मका, हळद, डाळिंब, तूर, बाजरी, उडीद, मुग ज्वारी, बाजरी, सोयाबीन, ऊस आणि कापूस पिकांचे भातशेतीचे तसेच भाजीपाल्याचे, फळपिकांचे, पशुधन, घरे, गृहोपयोगी वस्तू, गोठे, शाळा/शासकीय इमारतींचे नुकसान झाले असून विविध ठिकाणी अनेकांनी आपला जीव गमावल्याचे तसेच कित्येकांचे संसार उध्वस्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्व विदर्भात पुरग्रस्ताच्या मदतीकरीता ४५६ कोटींची आवश्यकता असताना देखील दिनांक ४ सप्टेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये फक्त १६ कोटी ४८ लक्ष रूपये मंजूर केले असून ती रक्कम सुध्दा अद्याप पूरग्रस्तांना मिळाली नसल्याचे दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्यामुळे शेतकऱ्यांना तसेच अतिवृष्टी, वादळी वारे, महापूर बाधितांना तातडीने दिलासा देण्यासाठी विनाविलंब संपूर्ण राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून त्यानुसार उपाययोजना करुन तातडीने आर्थिक मदत जाहीर करण्याबाबतची मागणी मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा तसेच राज्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री आदींकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही राज्यात पीक नुकसानीबाबतचा प्राथमिक अहवाल कोणतेही पंचनामे न करताच शासनास पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आले असून सदर प्राथमिक अंदाजावरील अहवालामध्ये नुकसान भरपाईसाठी किती रक्कम अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे याबाबत शासनाने चौकशी करुन शेती, पीक व फळ पिकांचे कोणतेही पंचनामे न करताच शासनास अहवाल सादर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील नुकसानग्रस्त विविध भागात मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा.विरोधी पक्षनेते व मा.लोकप्रतिनिधींनी भेटी देऊन नुकसानग्रस्त क्षेत्राची दिनांक १७ ते २० ऑक्टोबर, २०२० या दरम्यान पाहणी करुन संबंधित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक सहाय्य करण्याची व प्रचलित आणेवारी पध्दतीने निकष बदलण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच अतिवृष्टीमुळे तालुकानिहाय नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंचनाम्यानुसार तयार करण्यात आलेल्या अहवालावर निर्णय घेवून शासनाने अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना, मृतांच्या नातेवाईकांना, पूरग्रस्तांना व मृत्यूमुखी पडलेल्या जनावरांच्या धारकांना जाहीर करण्यात

येणाऱ्या हेक्टरी रूपये ५० हजार नुकसान भरपाईची रक्कम पिडितांच्या थेट बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे काय, उक्त प्रकरणी शासनामार्फत वारंवार उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०१-१२-२०२०) :** (१) होय.

(२), (३) व (४) दिनांक २० व २१ ऑगस्ट, २०२० आणि दिनांक ३० व ३१ ऑगस्ट, २०२० ते १ सप्टेंबर, २०२० या कालावधीत नागपूर विभागात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे नुकसान झालेल्या बाधितांना एकूण रूपये १८४,५२,८८,०००/- एवढा निधी वितरित करण्यात आलेला आहे.

राज्यात जून ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत झालेली अतिवृष्टी, पूरपरिस्थिती या नैसर्गिक आपत्तीमुळे पीक नुकसानीबाबत राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) च्या निकषानुसार ३३% पेक्षा अधिक बाधित क्षेत्राचे पंचनामे करण्यात आलेले आहेत. त्यानुसार ४१६७६१९.७७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा वाढीव दराने जिरायती व आश्वासित सिंचनाखालील पिकांसाठी रुपये १०,०००/- प्रति हेक्टर व बहुवार्षिक पिकांसाठी रुपये २५,०००/- प्रति हेक्टर या दराने दोन हेक्टरच्या मर्यादेत देण्याचा निर्णय घेण्यात आला असून शेतीपिकांच्या नुकसानीकरीता बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसाठी रुपये ४३९३३०.८६ कोटी निधीची आवश्यकता आहे.

(५) जून ते ऑक्टोबर, २०२० या मान्सुन काळात अतिवृष्टी, पूरपरिस्थितीमुळे शेती पिकांचे नुकसानाचे पंचनामे करण्यात आलेले आहेत. बाधित शेतकरी, मृत व्यक्तींचे वारसांना व मृत जनावरांच्या धारकांना आर्थिक मदतीचा पहिला हप्ता रुपये २२,९७,०६,३७,०००/- वितरित करण्यात आला असून मदतीची रक्कम बाधितांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील माहिती तंत्रज्ञान शिक्षकांना अनुदान मिळण्याबाबत

**(३८) ५६७१ (२५-११-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माहिती तंत्रज्ञान शिक्षक मागील २० वर्षापासून विनावेतन अत्यल्प वेतनावर कार्यरत असल्याने ऑनलाईन शिक्षण मंडळ परीक्षा यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन माहिती तंत्रज्ञान शिक्षकांना पूर्णवेळ वेतनश्रेणीत अनुदान मिळणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिक्षकांना पूर्णवेळ वेतनश्रेणीत अनुदान मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२०) :** (१) माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील माहिती व तंत्रज्ञान विषय शिक्षकांना शासन निर्णय, दिनांक ३० जानेवारी, २००२ अन्वये, पूर्ण वेळ शिक्षकास रुपये ५०००/- व अर्धवेळ शिक्षकास रुपये २५००/- तर घड्याळी तासानुसार नियुक्त शिक्षकांना प्रति तास रुपये ५०/- इतक्या मानधनावर नियुक्ती करण्यात येते.

(२) याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(३९) ५६७७ (१२-११-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.रणजित पाटील : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ३८७८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पासून नियुक्त कर्मचाऱ्यांना नवीन अंशदान पेन्शन योजना लागू करण्यात आली असून दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या विनाअनुदान शाळा, वर्ग तुकड्या तसेच अंशत: अनुदानित शाळा, वर्ग तुकड्यांवरील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नवीन अंशदान पेन्शन योजना लागू केली असून दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या नियुक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन देण्याबाबत शासनाचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या अभ्यास गटाने याबाबतचा अहवाल दिनांक ०३ जुलै, २०२० रोजी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालात अभ्यास गटाने शासनास सादर केलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदरहू अहवालातील कोणकोणत्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या आहेत, तद्नुषंगाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे, तसेच, नागपूर येथे झालेल्या राज्यातील शिक्षक व त्यांच्या संघटनेमार्फत जुनी पेन्शन योजना लागु करण्याबाबतच्या मागणीकरीता माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना बंद करण्याच्या अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यात आली असून सदर अधिसूचनेमध्ये स्थायी कर्मचारी (वेतनश्रेणीवरील) शिक्षकांना जुनी

पेन्शन योजना लागू राहील अशी तरतूद असल्यामुळे अंशत: अनुदानित व विनाअनुदानित शिक्षक वेतनश्रेणीवरील असल्यामुळे ते जुन्या पेन्शन योजनेला पात्र ठरतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वीचे स्थायी (अंशत: अनुदानित/विनाअनुदानित) यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-१२-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

अ.मु.स., शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.
(२) आंदोलन करण्यात आले होते. सदर समितीने या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्यामुळे शासनस्तरावर निर्णय घेण्याबाबत शिफारस केली आहे.
(३) हे खरे नाही. वित्त विभागाने शासन निर्णय, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४०) ५६७९ (१२-११-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी श्री.जयवंत खोत आणि प्रभारी माध्यमिक अधीक्षक श्री.दिलीप उबाळे यांनी आपल्या पदाचा आणि अधिकाराचा गैरवापर करून शिक्षण विभागात आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त दोन्ही अधिकाऱ्यांनी दिनांक ०६ जानेवारी, २०१९ ते दिनांक १० जुलै, २०२० या कालावधीत मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षण सेवक आणि नियमित सेवा सातत्य, शाळांमधील सेवाजेष्ठता यामध्ये बदल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोन्ही अधिकाऱ्यांच्या कालावधीत जिल्हा परिषदेने चुकीचे दिलेले अनेक वैयक्तिक मान्यतेचे आदेश शालार्थ आयडीसाठी शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई येथे गेले असता तेथून २० नस्त्या अमान्य होऊन परत पालघर, जिल्हा परिषद कार्यालयात आल्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०१० पासून शासनाने अमान्य केलेले शिक्षण विभागाचे प्रस्ताव उक्त दोन्ही अधिकाऱ्यांनी आर्थिक हितासाठी संगनमताने मान्य केल्याने सदर दोन्ही अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याकरीता अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त दोन्ही अधिकाऱ्यांना दोषी ठरवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर प्रस्ताव त्रुटी पूर्ततेसाठी शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. पालघर या कार्यालयास परत करण्यात आले होते. त्यापैकी १२ परिपूर्ण प्रस्ताव शिक्षण उपसंचालक, मुंबई कार्यालयास आवश्यक पुढील कार्यवाहीकरीता सादर करण्यात आले आहेत.

या प्रकरणी तक्रार शासनाकडे प्राप्त झाल्याची नोंद दिसून येत नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

# अल्पसंख्यांक प्री मॅट्रीक स्कॉलरशिपसाठी लागणारे प्रमाणपत्र स्वयंघोषित प्रमाणपत्रावर घेण्याबाबत

**(४१) ५७०५ (१२-११-२०२०) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्यांक प्री मॅट्रीक स्कॉलरशिपसाठी लागणारे उत्पन्न प्रमाणपत्र संबंधित अधिकाऱ्यांचेच लागत असून ते काढण्यासाठी पालकांना संबंधित कार्यालयात अनेकदा ये-जा करावे लागत असल्याने यामध्ये पालकांचे आर्थिक व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अल्पसंख्यांक प्री मॅट्रीक स्कॉलरशिपसाठी लागणारे पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र स्वयंघोषित प्रमाणपत्रावर घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (०२-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या प्री-मॅट्रीक स्कॉलरशिप योजनेंतर्गत नवीन अर्जांसाठी सक्षम प्राधिकरणाचे उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक आहे. मात्र नुतनीकरण अर्जांसाठी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची अट नाही.

विद्यार्थ्यांच्या पालकांचे स्वयंघोषित उत्पन्न प्रमाणपत्र मान्य करण्याबाबत केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन, विमा भरपाई व आर्थिक मदत देण्याबाबत

**(४२) ५७०९ (२७-११-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संकटामुळे तोट्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला शासनाने निधी देण्याबाबत व कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत मा.विरोधी पक्षनेते यांनी मा.परिवहन मंत्र्यांची भेट घेऊन त्यांना दिनांक २२ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साडेपाचशे कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय सर्व संबंधितांची बैठक घेऊन दिनांक ४ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.उप मुख्यमंत्री यांनी घेतला, तसेच उक्त निर्णयाप्रमाणे आतापर्यंत किती निधी देण्यात आला,

(३) असल्यास, आर्थिक संकटात असलेल्या एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना अहोरात्र मेहनत करुनही माहे जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२० चे वेतन अदा करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले असून वेतन मिळावे यासाठी कार्यवाही करावी अन्यथा फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी एस.टी. वर्कर्स इंटक काँग्रेस संघटनेने मा.मुख्यमंत्री व मा.परिवहन मंत्री आदींकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, तसेच कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या ३६ कर्मचाऱ्यांचे विमा दावे चुकीचे नियम लावून नामंजूर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, जळगाव आणि रत्नागिरी येथील एसटी कर्मचाऱ्यांना मागील तीन महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने येथील कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले असून एसटी महामंडळाच्या कार्यपध्दतीला कंटाळून व थकित वेतनामुळे मनोज चौधरी यांनी आत्महत्या केली असून आपल्या मृत्यूला शासन जबाबदार असल्याचे त्यांनी मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम असून सध्या राज्यात १ लाखाहून अधिक एसटी कर्मचारी कार्यरत असल्याने त्यांना मुळातच कमी वेतनावर काम करावे लागते व त्यातच वेतन देण्यास झालेल्या विलंबामुळे त्यांची तसेच त्यांच्या कुटुंबियांची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करुन त्यांना विनाविलंब वेतन अदा करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करुन एसटी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्याच्यादृष्टीने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०१-१२-२०२०) :** (१) मा.विरोधी पक्षनेते वि.प.स. यांनी परिवहन मंत्री यांना अग्रेषित केलेले दिनांक २७/०९/२०२० रोजीचे कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) शासन निर्णय, दिनांक ०५/०८/२०२० अन्वये महामंडळास रुपये ५५०.०० कोटी, शासन निर्णय, दिनांक ०१/१०/२०२० अन्वये रुपये १५०.०० कोटी व शासन निर्णय दिनांक ०९/११/२०२० अन्वये रुपये ७९.०० कोटी इतकी रक्कम सवलतमूल्यांच्या प्रतिपूर्तीपोटी अग्रिम स्वरुपात अदा करण्यात आली आहे. तसेच, राज्य शासनाच्या आकस्मिकता निधीमधून रुपये १२०.०० कोटी इतका निधी महामंडळास अदा करण्यात आला आहे.

(३) माहे जुलै ते ऑक्टोबर, २०२० पर्यंतचे संपूर्ण वेतन कर्मचाऱ्यांना अदा केले आहे. माहे ऑक्टोबर, २०२० पर्यंतचे सर्व वेतन अदा करण्याबाबतचे निवेदन महाराष्ट्र एस.टी. वर्कर्स इंटक काँग्रेस संघटनेने दिनांक २९/०९/२०२० रोजी दिले होते त्यामध्ये मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल असे देखील कळविले होते. तसेच, महामंडळाच्या दिनांक ०१/०६/२०२० च्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसारच कर्मचाऱ्यांच्या विमा दाव्यांबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) होय.

(५) राज्य परिवहन कर्मचाऱ्यांचे वेतन करारातील तरतुदीनुसार अदा केले जाते. मात्र, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे महामंडळाच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने निधी अभावी वेतन देण्यास विलंब झाला होता.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रेमडेसिवीर, टॉसिलिझ्युम्ब औषधांचा व मास्कचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(४३) ५७८६ (१२-११-२०२०) श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ विषाणू संसर्ग झालेल्या रुग्णांसाठी अत्यावश्यक ठरणाऱ्या रेमडेसिवीर, टॉसिलिझ्युम्ब औषधांचा व मास्कचा काळाबाजार होत असून रेमडेसिवीर औषधाच्या काळाबाजाराबाबत पूर्ण उपचारात प्रभावी औषध ठरणाऱ्या इंजेक्शनचा काळाबाजार होत असून चार हजारांचे औषध ४० हजारांना विकले जात असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना उपचारावरील एक महत्वाचे औषध असलेल्या रेमडेसिवीर औषधाचा संपूर्ण राज्यात तुटवडा जाणवत असून मृत्यूसंख्येतही वाढ होत आहे, तसेच औषधाच्या तुटवड्यामुळे त्याचा काळाबाजार सुरु असून गरीब रुग्णांचे सर्वाधिक हाल होत असल्याने सदरहू औषधाची खरेदी प्रक्रिया राबवून जिल्हा प्रशासनाला पुरेसा साठा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत तसेच खाजगी रुग्णालयात देखील सदर औषध मोफत उपलब्ध करून देण्याबाबत मा.विरोधी पक्षनेता यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्र लिहून विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू औषधाचा सगळ्यात मोठा पुरवठा हेटेरो फार्म कंपनीमार्फत होत असून कंपनीच्या खडकी, पुणे येथे असलेल्या गोदामात गैरव्यवहार सुरु आहे, तसेच सदरहू कंपनीची पॉलिसी फक्त कोविड हॉस्पिटल संलग्न असलेल्या मेडिकलला सदर औषध पुरवठा करण्याची असताना ह्या गोदामामधून गैरमार्गाने साठा इतर विक्रेत्याला दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री फार्मा, ऑक्सिकेअर मेडिको, खमाज मेडिकल, डी एस मेडिकल, लाईफ लाईन मेडिकल, संत सोपान मेडिकल, विघ्नहर्ता मेडिकल, धन्वंतरी मेडिकल, आरोही मेडिकल या सर्व पुण्यातील मेडिकलमध्ये खरेदी विक्री लेखात तीन ते चार हजार इंजेक्शनची नोंद नाही, तसेच, हेटेरो फार्माकडून बऱ्याच विक्रेत्यांची नावे देयके बनवून दुसऱ्याच विक्रेत्यांना विक्री करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यामुळे सामान्य जनतेला रेमडेसिवीर इंजेक्शनसाठी जादा पैसे मोजावे लागत असल्याने याप्रकरणी नागपूर येथील लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रार निवेदन दिले असून मा.अन्न व औषध प्रशासन मंत्री यांच्या सुचनेनंतरही काळाबाजार सुरुच असल्याने जनतेने अशा काळाबाजार करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्यांविरोधात संताप व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औषधांचा काळाबाजार रोखण्यासाठी कार्यवाही करुन संबंधित दोषींचे परवाने रद्द करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच आतापर्यंत किती व्यावसायिक, एजंट व अन्य व्यक्तींविरुध्द कारवाई करण्यात आली तसेच किती रकमेचा माल जप्त करण्यात आला, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०१-१२-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे.

दिनांक १०/०७/२०२० रोजी घातलेल्या एका धाडीत रुपये ५४००/- किंमतीचे Remdesivir Injection रुपये २०,०००/- ला विक्री होत असल्याचे आढळून आले. तसेच इतर ठिकाणी जास्त किंमतीत विक्री होत असल्याचे आढळले.

(२) हे ही अंशत: खरे आहे.

मा.विरोधी पक्षनेता यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २/१०/२०२० रोजी पत्र दिले आहे.

(३) व (४) खरे आहे.

दिनांक २८/०९/२०२० रोजी हेटेरो हेल्थकेअर लि. वडकी या वितरक संस्थेची तपासणी केली असून त्यानुषंगाने कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील कारवाई सुरु आहे.

तसेच या सर्व किरकोळ विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली असून तपासणीत आढळलेल्या दोषावरुन त्यांच्याविरुध्द कार्यवाही घेण्यात येत आहे.

(५) हे खरे नाही.

(६) कोरोना औषधांच्या नियंत्रणासाठी महाराष्ट्र राज्यात एकूण २८,४७४ तपासण्या केल्या आहेत. तसेच एकूण ८४ धाडी टाकण्यात आल्या असून त्यामध्ये औषधांचा व मास्कचा एकूण सुमारे २१,८५,५६६/- इतक्या किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच १९ व्यक्तींना अटक करण्यात आली असून संबंधितांविरुध्द FIR नोंदविण्यात येवून पुढील तपासकाम चालू आहे.

---

## राज्यातील दूध भेसळ रोखण्याबाबत

**(४४) ६००० (१२-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दूध भेसळ रोखण्यासाठी तसेच जनतेला शुध्द सकस दूधाचा पुरवठा करण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करुन कृती आराखडा तयार करण्याचे काम माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सुरु करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूध भेसळीची साधारणत: किती प्रकरणे निदर्शनास आली आहेत व यावर उपाययोजना करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे काय, कृती आराखड्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दूध भेसळ रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०१-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय, दिनांक ०३/०३/२०२० च्या अनुषंगाने राज्यामध्ये दुधात होणारी भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग व दुग्ध व्यवसाय विकास विभाग यामधील अधिकारी व कर्मचारी यांची संयुक्त पथके स्थापन करण्यात आलेली आहेत व सदर पथकाव्दारे संयुक्तपणे समन्वयाने तपासणी व नमुने घेण्याचे कामकाज करण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनातर्फे राज्यभरात दिनांक ०१/०४/२०२० ते १५/११/२०२० या कालावधीत दुध उत्पादक व विक्रेते यांचेकडून एकूण ४२८ दुधाचे नमुने विश्लेषणास घेण्यात आलेले असून त्यापैकी १५७ नमुने प्रमाणित, २७ नमुने मानदाप्रमाणे नसल्याचे तर ०१ नमुन्यात Maltodextrin आढळून आल्याने असुरक्षित असल्याचे आढळून आले आहे. तसेच ६,४४६.१ लिटर किंमत ३,८८,८९६/- रुपयेचा दुधाचा साठा जप्त करून नष्ट करण्यात आलेला आहे. मानदाप्रमाणे नसलेल्या २७ नमुन्यांपैकी ७ प्रकरणी एकूण रुपये ३२,०००/- इतका तडजोड दंड करण्यात आलेला असून उर्वरीत २० मानदाप्रमाणे नसलेल्या प्रकरणी व ०१ असुरक्षित नमुन्या प्रकरणी प्रकरणनिहाय कार्यवाही घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित नसल्याबाबत

**(४५) ६०४७ (०१-१२-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात विविध कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून परिवहन कार्यालय एका ठिकाणी तर पासिंगचा ट्रॅक कार्यालयापासून कित्येक किलोमीटर दूर असल्याने पासिंगसाठी जी वाहने ट्रॅकवर जातात त्यांना तेथे पासिंग अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे अधिकारी कर्मचारी या ठिकाणी काम करतात ते वेळेवर कार्यालयात हजर होत नसल्याने याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी केल्या असून या कार्यालयात सेवेत असलेले अधिकारी, कर्मचारी त्यांचे कर्तव्य बजावत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातत्याने या ठिकाणी प्रभारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नेमले जात असल्यामुळे येथील नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असून विद्‌यमान परिवहन अधिकारी यांची उपस्थिती कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०२-१२-२०२०) :** (१) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी आवश्यक असलेली जागा शहराच्या लगत उपलब्ध नसल्याने शहरापासून सुमारे १२ कि.मी. अंतरावरील मौजे शहाजहानपूर, ता.बीड येथे ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्यात आलेला आहे. या कामी बीड कार्यालयातील १ मोटार वाहन निरीक्षक तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथील चक्राकार पध्दतीने नियुक्त १ अशा एकूण २ मोटार वाहन निरीक्षकांव्दारे विहित केलेल्या कोट्यानुसार वाहनांची तपासणी करण्यात येते.

(२) या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) अंशत: खरे आहे.

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड या पदाचा अतिरिक्त कार्यभार उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांच्याकडे देण्यात आला आहे. परिवहन आयुक्त यांच्या आदेशानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथील एका सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची सेवा वर्ग करण्यात आली होती. तथापि ते हजर न झाल्याने त्यांना शासन सेवेतून निलंबित केले आहे. त्यामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथील सेवाज्येष्ठ मोटार वाहन निरीक्षकाची ४ महिन्याच्या चक्राकार पध्दतीने सेवा वर्ग केली आहे.

(४) शासनाच्या पदोन्नती धोरणानुसार उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी व मोटार वाहन निरीक्षक या संवर्गातील खुल्या प्रवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची बाब कार्यवाहीखाली आहे.

सद्य:स्थितीत बीड कार्यालयात मोटार वाहन निरीक्षक संवर्गात ६ तर सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक संवर्गात ९ पदे भरण्यात आलेली आहेत. वरिष्ठ लिपीकाचे १ पद भरण्यात आलेले असून २ पदे औरंगाबाद व जालना कार्यालयातून सेवा वर्ग पध्दतीने भरण्यात आली आहेत. कनिष्ठ लिपिक संवर्गातील ५ पदे भरण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

**(४६) ६०५६ (१२-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) प्रत्येक घरी पिण्याचे स्वच्छ पाणी पोहोचण्यासाठी स्थापन झालेल्या जलशक्ती मंत्रालयाकडील आकडेवारीनुसार राज्यातील ग्रामीण भागातील २०% लोकसंख्येला रोज किमान ४० लिटर सुध्दा पाणी उपलब्ध होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी टंचाईमध्ये १.८७ कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रातील २२ हजार ९७ गावांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पाणीटंचाई दूर करण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०१-१२-२०२०) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (IMIS) जिल्ह्यांनी नोंदीत केलेल्या दिनांक २४/११/२०२० रोजीच्या माहितीनुसार राज्यातील ग्रामीण भागातील ४.८३ कोटी लोकसंख्या असलेल्या ७७४५१ वाड्या/वस्त्यांना ४० LPCD प्रमाणे पाणीपुरवठा होत असून, १.८६ कोटी लोकसंख्या असलेल्या २२०४५ वाड्या/वस्त्यांना ४० LPCD पेक्षा कमी पाणीपुरवठा होत आहे.
(३) महाराष्ट्र भुजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ कलम २५ च्या तरतुदीनुसार जिल्हयातील विशिष्ट क्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होण्याची शक्यता अथवा टंचाई निर्माण झाली आहे असे जिल्हा प्राधिकरणाची खात्री झाल्यास त्या क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाहीर करण्याचे अधिकार जिल्हा प्राधिकरणास विहित केलेले आहेत.

ग्रामीण क्षेत्रात प्रतिदिन प्रतिमाणसी २० लिटर पेक्षा कमी पाणी उपलब्धता संभावित असल्यास टंचाई निवारणाच्या उपाययोजना टंचाई क्षेत्रात घेण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मास्कच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(४७) ६०५९ (१२-११-२०२०) श्री.रमेश कराड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने आदेश काढून मास्कच्या किंमतीवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न करुनही राज्यात एकाही ठिकाणी औषध दुकानाच्या दर्शनी भागावर मास्कच्या किंमती लावण्यात आल्या नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असून आदेश काढून दहा दिवस झाले तरी कोणीही किंमती कमी करीत नसून राज्यात शासन आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या एकाही दुकानावर अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी व शासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने ग्राहकांची फसवणूक थांबविण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार चौकशीअंती आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर कारवाई करुन मास्कच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०१-१२-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय, दिनांक २०/१०/२०२० अन्वये राज्यात मास्क (एन ९५, २ प्लाय व ३ प्लाय) चे दर निश्चित केलेले आहेत. त्यानुषंगाने सर्व औषध विक्रेत्यांना सुचित करण्यात येवून त्यासंदर्भात पडताळणी केली असता, राज्यात सुमारे १८७९८ औषध विक्री दुकानांच्या दर्शनीय भागात मास्कच्या किंमतीबाबत फलक प्रदर्शित करण्यात आलेला असल्याचे प्रत्यक्ष दर्शनी दिसून आले आहे.
(४) या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने एकूण ३९३८ तपासण्या केल्या असून त्यापैकी १६७ प्रकरणी मास्कची जादा किंमत आकारल्याचे आढळले व त्यांना औषधी व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत नोटीस बजावण्याची कार्यवाही घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लोहा (जि.नांदेड) तालुक्यात गुटख्याची विक्री होत असल्याबाबत

**(४८) ६०८१ (१२-११-२०२०) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड** : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यात शासनस्तरावर गुटखाबंदीचा निर्णय झाला असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शासन नियमाचे उल्लंघन करुन गुटखा व्यावसायिक गुटखा विक्री करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या शहरात ५ व ग्रामीण भागात ५ बेकायदा होलसेल गुटखा विक्रेते असून सुमारे ७० लघुविक्रेते आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदा गुटखा विक्रेत्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०१-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अन्न व औषध प्रशासनाच्या नांदेड जिल्हा कार्यालयामार्फत शहरात व ग्रामीण भागात २०१९-२०२० या कालावधीत ४४ प्रकरणात रुपये १,३५,७४,८४५/- एवढ्या रकमेचा साठा जप्त करण्यात आला असून ४४ प्रकरणी फिर्याद दाखल करण्यात आली असून ३७ प्रकरणात तपास पूर्ण होऊन संबंधित जबाबदार व्यक्तींविरुध्द मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच सन २०२०-२०२१ या कालावधीत ४१ प्रकरणात रुपये १,०४,०९,०८०/- एवढ्या रकमेचा साठा जप्त करण्यात आला असून ४१ प्रकरणी पुढील तपासासाठी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शासकीय भूखंडाचे धरणग्रस्तांना वाटप करण्याबाबत

**(४९) ६०९१ (११-११-२०२०) श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शहरालगत मौजे कासेगाव येथील २५ एकराचा शासकीय भूखंड जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी संपादित करुन पुनर्वसित नागरीकांना वाटप करण्यासाठी आरक्षित केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड धरणग्रस्त नागरीकांना देण्याचे शासनाने निश्चित करुनही त्याचे वाटप करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंडावर स्थानिक राजकीय व्यक्तीकडून अधिकारी वर्गावर दबाव आणून भूखंड बळकाविण्याचा प्रयत्न होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर भूखंडाचे धरणग्रस्तांना वाटप करुन सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२६-११-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

तहसिलदार, पंढरपूर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ अन्वये त्यांनी त्यांचेकडील दिनांक २२/०८/२०१९ रोजी दिलेले निकालपत्र व फेरफार क्र. २४२१२ अन्वये मौजे कासेगांव गट नं.६१/१ (क्षेत्र ०.९२ हे.आर) व ६२/२ (क्षेत्र ६ हे ९१ आर) यांचे गटांचे कब्जेदार सदरी जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमीन) सोलापूर अशा नोंदी दाखल केल्या आहेत.

(२) वर अ.क्र. १ मध्ये नमुद गट नं.६१/१ व ६२/२ मधील जमिनी प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्याबाबतचा अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) हे खरे नाही.

(४) वर अ.क्र. १ मध्ये नमुद जमिनी गट नं.६२/२ च्या जमीन मालकांनी तहसिलदार, पंढरपूर यांच्या दिनांक २२/०८/२०१९ च्या आदेशाविरुध्द उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांचे न्यायालयात अपील अर्ज दाखल केला असून सदर अपील अर्ज सुनावणीकरीता प्रलंबित आहे. तसेच सदर जमीन मालकांनी मे.दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) पंढरपूर येथे नियमित दिवाणी दावा दाखल केला असून मा.न्यायालयाने सदर प्रकरणी “जैसे थे” स्थिती चे आदेश दिले आहेत.

तसेच गट नं.६१ पै जमीन मालक यांनी या गटाचे कधीही भूसंपादन झाले नसून तिचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये अन्यथा कायदेशीर कारवाई करणेत येईल, अशा प्रमाणे कायदेशीर नोटीस दिनांक ०९/११/२०२० रोजी जिल्हा पुनर्वसन कार्यालय, सोलापूर यांचेकडे दाखल केली आहे.

सदर गटांबाबत वरीलप्रमाणे अर्धन्यायिक व न्यायिक दावे प्रलंबित असल्याने अंतिम निर्णय झालेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिवभोजन थाळीत अनेक केंद्र चालकांनी भ्रष्टाचार केल्याबाबत

**(५०) ६१७२ (०१-१२-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गरजूंना अल्पदरात अन्न मिळवून देण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या शिवभोजन थाळ्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय शासनाने घेऊन सुध्दा शिवभोजन योजनेत केवळ २५ लोकांना जेवण देऊन उर्वरित थाळ्यांचे डुप्लिकेट फोटो अपलोड करून शिवभोजन थाळीत अनेक केंद्र चालकांनी भ्रष्टाचार केल्याचे अहमदनगर जिल्ह्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिवभोजन थाळी योजनेमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०३-१२-२०२०) :** (१) व (२) मा.विधानसभा सदस्य, अहमदनगर यांनी अशा प्रकारची तक्रार मा.मंत्री (अनापु) यांच्याकडे दिनांक ०३/०५/२०२० च्या पत्रान्वये केली आहे. त्यावर जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांनी चौकशी केली असून त्यानुसार अशी कोणतीही बाब आढळून येत नसल्याचे नमूद केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेंद्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.